



॥श्री॥

# आत्माराम (विवरण)

श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या अस्सल वेदान्तपर काव्यरचनांचा, आत्माराम हा ग्रंथ मेरूमणी ठरावा असा आहे.

नाना ग्रंथांच्या संमती । उपनिषदें वेदांत श्रुती । आणि मुख्य आत्मप्रचिती । शास्त्रेंसहित ॥

ही दासबोधाच्या रचनेसंबंधी त्यांनी सांगितलेली वस्तुस्थिती आत्मारामाचे बाबतीतही तितकीच खरी आहे. निर्भेळ वेदान्ताची ही रचना असल्याने तिचा अभ्यासही शास्त्राच्या अनुरोधाने केला असता अधिक फलदायी ठरतो. कोणत्याही अध्यात्मशास्त्राच्या ग्रंथरचनेमध्ये अनुबंध व लिङ्गे यांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे विचार केलेला असतो. यामुळे साधकाच्या मनात चिंतनाला एक निश्चित चौकट प्राप्त होईन अभ्यासाला अर्थपूर्णता येते.

## अनुबंध

अधिकारी - "कां जे तुझी भ्रांति फिटली नाहीच अद्यापि ॥" (१-१९) हा आत्मारामाचा अधिकारी आहे. काही ग्रंथांचा अभ्यास करूनही परमार्थ म्हणजे नेमके काय ते न समजल्याने व त्या अनुरोधाने प्रत्यक्ष साधना न घडल्याने अनुभव न आल्यामुळे ज्याचा भ्रम नाहीसा झालेला नाही तो आत्मारामाचा अधिकारी होय. ज्याचा देह-मन सापेक्ष अहंकार बाधित झालेला नाही त्याचा अहं-मम भ्रम नष्ट होत नाही. शरीरसापेक्ष "मी" व प्रपंचसापेक्ष "माझे" असा भ्रम आहे तोपर्यंत आत्मारामाचे दर्शन होत नाही. म्हणजेच ज्याने जड व चंचल आत्मनिवेदन केले असून निश्चळ आत्मनिवेदन झालेले नाही त्याला या ग्रंथाचा खरा लाभ होईल. (दा.बो.१२-५) तो या ग्रंथाचा खरा अधिकारी आहे.

विषय - ग्रंथाचा विषय निश्चित असला म्हणजे अभ्यासाचा विषय निश्चित होतो. मांडणी केली जात असताना, प्रासंगिक विषय मधे मधे आले, तरी मुख्य विषयाचे अनुसंधान सुटत नाही.

"म्हणून नाशिवंत तितुका मळ । तुवा त्यजावा अमंगळ । तो गेलिया तूंचि केवळ । आहेस बापा ॥"(२-९)

हा आत्मारामाचा विषय आहे. अनात्म, म्हणजे मायिकाचा त्याग केला असता आत्मानुभव येतो हा या ग्रंथाचा मुख्य विषय आहे.

प्रयोजन - अधिकारी साधकाने वरील विषयाचा अभ्यास करण्याच्या हेतूला प्रयोजन असे म्हणतात.

"दासबोधीचे समासी । निर्मूळ केले मीपणासी । तया निरूपणेंही वृत्तीसी । पालट दिसेना ॥" (१-२०)

दासबोधाच्या अभ्यासानंतरही जर समाधानाची योग्य दिशा सापडली नसल्याने अपेक्षित परिणाम दिसत नसेल तर त्याने

आत्मारामाचे चिंतन करावे.
संबंध - आत्माराम हा ग्रंथ व त्याचा अधिकारी वाचक यांच्यात प्रयोज्य-प्रयोजक संबंध आहे. म्हणजे आत्माराम हा ज्ञानाचा प्रयोजक असून साधक प्रयोज्य आहे. हा केवळ तांत्रिक विषय आहे.

## सहा लिङ्गे

१) उपक्रम व उपसंहाराची एकवाक्यता - लिङ्ग म्हणजे ग्रंथाच्या अभ्यासाचा आधार किंवा सद्ग्रंथाचे सहा निकष म्हणजे सहा लिङ्गे. ग्रंथाच्या मुख्य विषयाच्या मांडणीचा आरंभ म्हणजे उपक्रम. ग्रंथाची मांडणी पूर्ण झाल्यावर त्या विषयाशी सुसंगत निष्कर्ष निघाला की तो उपसंहार. उपक्रम व उपसंहाराची एकवाक्यता किंवा सुसंगती हे चांगल्या ग्रंथाचे लक्षण आहे.
"तया निजपदाकडे । आनंदे वृत्ति वावडे । पद लाधलिया जडे । तद्रुप होऊनि ॥"(१-८) हा उपक्रम असून -
"ऐसा कृपाळू स्वामीराव । आदिपुरूष देवाधिदेव । शिष्यांस निजपदी ठाव । ऐक्यरुपें दिधला ॥" हा उपसंहार आहे. पद व तद्रूपता या उपक्रमाची निजपद व ऐक्यरूप यांचेशी एकवाक्यता आहे.

२)अभ्यास - श्रवणादी साधने व विवेकादिकांचे अनुसंधान व आचरण सतत चालू ठेवणे म्हणजेच अभ्यास. तो असा असावा -
"श्रवण आणि मनन । या ऐसें नाही साधन । म्हणोनी हे नित्यनूतन । केलें पाहिजे ॥" (४-५)

३) अपूर्वता - ग्रंथ व ग्रंथातील विषयाचे काहीतरी वैशिष्ट्य असावे. मांडणीत विशेषता असावी. "स्पष्ट व नाट्यमय गुरू शिष्य संवाद" हे वैशिष्ट्य या ग्रंथामध्ये जाणवते.
"तू नाशिवंतांमध्ये आलासी । आपणांस कां रे चोरिसी? । नाशिवंत देतां चकचकीसी । फट् रे पढतमूर्खा! ॥" (४-१२)

४) फळ - ग्रंथाचे प्रयोजन सिद्धीला गेले की त्याला फळ असे म्हणतात.
"मी संसारीहून सुटलों । पैलपार पावलों । मीच सकळ विस्तारलों । सर्वां भूतीं ॥" (५-४)
अनुबंधातील प्रयोजनामध्ये संकुचित मीपणा गेला नसल्याचे समर्थांनी शिष्याच्या लक्षात आणून दिले होते. तो मी पणा येते ब्रह्मरूप झाला आहे. हेच ग्रंथाचे फळ.

५) अर्थवाद - ग्रंथाच्या स्तुतीला अर्थवाद म्हणतात. आत्मारामामध्ये समर्थांनी हे लिङ्ग विलक्षण पद्धतीने मांडले आहे.
"ग्रंथ संपता स्तुती उत्तरे । बोलताती अपारे । परी अर्थासी कारण, ये रे । येरा चाड नाही ॥" (५-२७)
माझ्या या ग्रंथाची स्तुती न करता त्याच्या मुख्य विषयाशी साधनरूप निष्ठा ठेवावी असा आग्रह समर्थ येथे धरतात.

६) युक्ती - प्रतिपाद्य विषय समजावून सांगताना काही चपखल उदाहरणांचा किंवा तर्कांचा उपयोग केला जातो. तीच युक्ती "जें जालेचि नाही सर्वथा । तयावरी निर्गुणाची सत्ता । ऐसें हें ज्ञातेपणें बोलतां । तुज लाज नाहीं ॥" (२-२५)
जे जग मायिक असल्याने (!)वास्तविक नाही, त्याला निर्गुणाचे अधिष्ठान आहे असे मोठ्या शहाणपणाने म्हणताना तुला लाज कशी वाटत नाही? निर्गुणाला "अधिष्ठानत्व" हा गुण नसतो हे समजावून सांगताना समर्थांनी हा तर्क मांडला आहे. सिनेमातील नाट्यमय प्रसंग व ठसकेबाज संवाद थोडक्यात ट्रेलरमध्ये दाखवतात. त्यामुळे सिनेमाचे स्वरूप कळते.

त्याचप्रमाणे अनुबंध व षड्लिङ्गांमुळे ग्रंथाचे स्वरूप कळते. कोणत्याही व्यापक प्रस्तावनेपेक्षा अनुबंध व लिङ्गे यांचा विचार ग्रंथांच्या अंतरंगामध्ये शिरण्यास जास्त उपयुक्त ठरतो.

काही ओव्या व विवरण –

दासबोधीचे समासी । निर्मूळ केले मीपणासी । तया निरुपणेही वृत्तीसी । पालट दिसेना ॥१-२०॥
दासबोधाच्या समासामध्ये "मी नावाची गोष्टच सिद्ध होत नाही", असे तुझ्या लक्षात आणून दिले होते. पण त्या सांगण्याने मीपणा नाहीसा होऊन जो तुझ्या वृत्तीत बदल अपेक्षित होता तो दिसत नाही. एकवीस समासी दासबोधातील तेराव्या समासात "मी" चा पूर्ण परामर्श घेतला आहे. तो मुळांतून पाहणे चांगले. तरीही "मी" च्या निर्मूलनाची दिशा पाहता येईल. जेथे सापेक्षता असते तेथे मिथ्यत्व असते हे लक्षात घेतले तर सापेक्ष "मी" मिथ्या म्हणजे निर्मूल आहे हे कळेल.

| | सापेक्षता | परिणाम | निरपेक्षता |
|---|---|---|---|
| १) | स्थूल देह | मी लठ्ठ, काळा, उंच | ब्रह्म "अकाय" आहे |
| २) | सूक्ष्म देह | मी चाणाक्ष, मठ्ठ, दमेकरी | ब्रह्म अमन, अप्राण |
| ३) | महाकारण देह | सोऽहं साधना | ब्रह्म ज्ञानरूप |
| ४) | कारण देह | मी अज्ञानी आहे | ब्रह्म भेदशून्य (स: व अहं नाही) |

चार देहांच्या संदर्भात जेव्हा मीपणा जागा राहतो तेव्हा त्याचे परिणाम वरीलप्रमाणे दिसत राहतात. आत्मज्ञानाने चारी देहांचा निरास झाल्यावर चार देह निरपेक्ष अवस्थेमध्ये ते परिणाम बाधित होतात. म्हणजे शरीराची उंची जाणवत राहिली तरी शरीर निरपेक्ष मी म्हणजे आत्मा उंच नाही असे ज्ञान झालेले असते. खरा आत्मरूप मी उंच नाही असे कळले तरी शरीराची उंची नष्ट होत नाही ! यालाच उंचीचा बाध असे म्हणतात. देहसापेक्ष मी भ्रमरूप असून देहनिरपेक्ष मी सत्य आहे. चारी देहांना उत्पत्ती, स्थिती व लय असल्याने ते मिथ्या किंवा भ्रमरूप आहेत. अज्ञानामुळे मीची भाषा पत्करल्याने निरपेक्ष मी ची भाषा बोलावी लागते. एरवी "मी" हे प्रकरणच मिथ्या म्हणजे निर्मूल आहे. मग तो मीपणा सापेक्ष असो की निरपेक्ष असो. हे शिष्याला न कळल्याने तो सापेक्ष मी च्या परिणामातून सुटला नव्हता. निरपेक्ष मी च्या साधना घोटाळला होता, रेंगाळला होता.

ज्ञानदेव म्हणतात -
"विचारूनि अहंकारू सांडिजे । मग असतीचि वस्तु होईजे । आपुली स्वस्ती सहजे । आपण केली ॥"
म्हणून न पुसतां सांगणे । पडले शिष्या तुजकारणें । आतां तरी सोये धरणें । श्रवण मननाची ॥१-२१॥
"म्हणून तुला काहीच शंका न आल्याने तू जरी विचारले नाहीस तरी तुझ्या खऱ्या कल्याणासाठी तुला सांगावेच लागेल. विचारल्याशिवाय सांगू नये असा शिष्टाचार बाजूला ठेवूनही मी तुला सांगतो आहे. यापूर्वीही दासबोधाच्या निमित्ताने तुला श्रवण घडले खरे. पण त्याचे तू साधनांत रुपांतर केले नाहीस, किंवा ते पुरेशा गंभीरतेने व तीव्र मुमुक्षूच्या भूमिकेतून केले नाहीस, आता यापुढे जे सांगेन ते तरी असे करू नकोस." श्रवणाचे महात्म्य सर्व संतांनी सतत सांगितले आहे. दासबोधातील ४-१, ७-४, ९-५, १३-२, १३-७, १८-१० हे समास या संदर्भात पाहण्यासारखे आहेत.

त्यागिसी सकळ वैभवाला । आणि विश्वाससि माजिया बोला । तरि मी घालीन रे तुजला । जेतील तेथे ॥१-३०॥
प्रथम मी तुला सांगतो त्यावर पूर्ण विश्वास असला पाहिजे. या श्रद्धेशिवाय आजपर्यंत कोणालाच पारमार्थिक वैभव मिळालेले

नाही. अनुभव येईपर्यंत सर्व प्रवास श्रद्धेनेच करावा लागतो. हे वैभव हवे असेल तर तुझे मायिक वैभव तुला सोडावेच लागेल. त्या त्यागाचे स्वरुप असे आहे - "न करी रे संग राही रे निश्चळ । लागो नेंदी मळ ममतेचा ।" (तुकाराम) तू शरीर, गृहादी व गणगोतांचा संग सोडून दे. म्हणजे त्यांच्यासंबंधी माझेपणाची बुद्धी टाकून दे. त्यांच्यासंबंधी अनावश्यक विचारांत वेळ घालवू नको व त्या विचाराने मन व्यग्र करू नको. एक तर संपूर्ण संन्यास घे किंवा चरितार्थासाठी व्यवहार कर. तो केवळ कर्तव्यबुद्धीने करून कोणात किंवा कशात आसक्त होऊ नकोस. असा तू अनासक्त मोकळा झालास की तुझ्या मूळ स्वरूपाचा मी तुला अनुभव देईन. "आये दुःखं व्यये दुःखं" म्हणजे संपत्ती कमवताना दुःख व खर्च होताना दुःख असा संपत्तीचा व दुःखाचा अतूट संबंध आहे. परंतु जो "जोडोनिया धन उत्तम व्यवहारे । उदास विचारे वेच करी ।" या तुकोबारायांच्या उपदेशाप्रमाणे वागलास तर संपत्ती व दुःखाची ताटातूट होईल.

ज्ञानदेव म्हणतात -
"मग तया अपोवो थोर आहे । जेणे ते हातीचे सकळ जाये । देखां प्राप्तही न लाहे । भोग भोगू ॥" (ज्ञा. ३-१०८)
धनासक्ती व भोगासक्तीमुळे अधर्माने संपत्ती मिळविली तर फार मोठे नुकसान होते. मिळविलेली सर्व संपदा हातातून निघून जाते. जे आहे त्याचाही भोग घेता येत नाही. विहित पद्धतीने अनासक्त वृत्तीने व्यवहार केलास तर तुझे चित्त शुद्ध होऊन त्या चित्ताला चैतन्यांत एकरूप होणे फार सोपे जाईल.
जितके काही नासोन जाईल । जे अशाश्वत असेल । तुज समागमे न येईल । तितुकेच द्यावे मज ॥१-३२॥
जे नाशिवंत, अशाश्वत व मृत्युनंतर तुझ्याबरोबर येणार नाही तेवढेच तू मला दे !

"देह पंचभूत मेळावा । शेखी जाईल पंचत्वा ।" या ज्ञानदेवांच्या म्हणण्याप्रमाणे शरीर नाशिवंत आहे. जे जे त्रिकालाबाधित नसते ते ते अशाश्वत असते. देहाला व जगाला उत्पत्ती, स्थिती व लय असतो म्हणजे ते उत्पत्तीपूर्वीच्या भूतकाळात नसतात (प्राक्अभाव), स्थितीकाळच्या वर्तमानकाळात असतात व नाशानंतरच्या भविष्यकाळात (प्रध्वंसाभाव) असणार नाहीत. देह व जग तीन काळांच्या मर्यादेत असतात (कालपरिच्छेद). ब्रह्म अनादी व अनंत असल्याने व सच्चिदानंदरूपाने अखंड असल्याने तेच फक्त शाश्वत किंवा सत्य आहे. मृत्युच्या वेळेला पंचमहाभूते जगातील पंचमहाभूतांत विलीन होत असल्याने मरणाऱ्याबरोबर जात नाहीत. जगाचे आयुष्य शरीराच्या मानाने फार फार जास्त असल्याने जग मागेच राहते. म्हणजे समर्थांनी शिष्याचे शरीर व शिष्याच्या मर्यादित जगाची मागणी केली. अर्थात् देहतादात्म्य व जगत्सत्यत्व भ्रांती सोडून देण्यास सांगितले.

तो शिष्य म्हणे स्वामी सर्वज्ञा । सत्य करावी प्रतिज्ञा । नाशिवंत घेऊन साधना । वरपडे न करावे ॥४-८॥
शिष्याच्या विचारांतील गोंधळ अजून निवळलेला नाही. समर्थांनी साधनेचे महत्व सांगण्यास सुरूवात करताच, "नाशिवंत तेवढे तू मला देताच तुला आत्मपद निश्चयाने प्राप्त होईल" या समर्थांच्या आश्वासनाची शिष्याला आठवण झाली (स. १-३५) शिष्याच्या कल्पनेनुसार जेवढे म्हणून नाशिवंत ते त्याने तात्काळ दिले होते. नंतर त्यातील अपुरेपणा मायेचे व ब्रह्माचे स्वरूप समजावून घेतल्यावर पूर्ण झाला होता. (समास २ व ३) मग आता साधना कशासाठी? शिष्य म्हणतो, "माझ्याकडून नाशिवंताचा त्याग आपण घडविला आहे आपण श्रेष्ठ व सर्वज्ञ आहात. आता यानंतर या त्यागापेक्षा दुसऱ्या कोणत्याही साधनाला अधिक मूल्य आपण देवू नये." मिथ्या नाशिवंताची परमसीमा शिष्याने अजून जाणलेली नाही हे लक्षात घेऊन समर्थ सांगतात.
अरे शिष्या चित्त द्यावे । नाशिवंत तुवा ओळखावे । साधन लागे करावे । प्रतिज्ञाच आहे ॥४-९॥
अरे तू पुरेपूर विचार कर. सूक्ष्मातिसूक्ष्म नाशिवंताचा शोध घे. त्याचा तुझ्याकडून त्याग घडला तर तुला साधन करावे

लागणार नाही, हे अजूनही माझे म्हणणे आहेच ! ज्ञानदेवांचे वर्म लक्षात घ्यावे -

येथे अविद्यानाश हे स्थळ । मोक्षोपदान हे फळ । इही दोहीसी केवळ । साधन ज्ञान ॥
नाशिवंत, मिथ्या अविद्येचा त्याग हेच साधनेचे वर्म आहे. हा अविद्यानाश अपरोक्ष ज्ञानाने होऊन मोक्षलाभ होतो. अविद्यानाश होताच अपरोक्ष ज्ञान नित्यप्राप्तच आहे. येथे साधना अविद्यानाशासाठी असून तिचे फळ जे ज्ञान ते होताच खरा अविद्यानाश होऊन साधना संपते. म्हणजे आत्म्याच्या अपरोक्षज्ञानाने अविद्येचे अस्तित्व बाधित होते व साधनेने अविद्येचा नाश केला असता आत्म्याचे नित्यप्राप्त ज्ञान जणू पुन्हा होते ! सूक्ष्म नाशिवंताचे वर्म समर्थ स्पष्ट करतात.

प्रतिज्ञा करावी प्रमाण । ऐसे बोलतो हा कोण । नाशिवंत केले मदार्पण । त्यामध्ये तो हि आला ॥ ४-१०॥
तू म्हणसी जे दिधले । तरी देयास कोण उरले । जे उरले ते झुरले मजकडे ॥ ४-११॥
तू नाशिवंतामध्ये आलासी । आपणांस कां रे चोरिसी? । नाशिवंत देता चकचकीसी । फट् रे पढतमूर्खा ॥४-१२॥
हा संवाद पढतमूर्खासी होतो आहे ! येथे पढतमूर्ख या शब्दाचा "विषयाचे अचूक व अंतिम स्वरूप न जाणता आपणांस विषय चांगला समजला असे मानणारा" असा होतो. समर्थ स्पष्ट शब्दांत शिष्याला ती जाणीव करून देतात व उत्तर देण्यांस सुरुवात करतात.
"आपली प्रतिज्ञा आपण पूर्ण करावी" असे जे तू म्हणाला, ते म्हणणारा कोण आहे? त्याचे खरे स्वरूप काय आहे? तू नाशिवंत तेवढे सगळे अर्पण केले असशील तर त्यात या बोलणाऱ्याचाही समावेश होतो ! नाशिवंत ते सर्व तू दिलेस असे तुझेच म्हणणे आहे. ते दिल्यानंतर पुन्हा प्रश्न विचारणारा वेगळा कसा राहील? जे काही अजून उरले आहे असे तुला अज्ञानामुळे वाटते, ते तर तू मला केव्हांच देऊन टाकले आहेस. जे नाशिवंत आहे ते सुद्धा मला देताना तुझा जीव खालीवर होतो !! -----

***